**रेफरन्स आयटी ८/२००९**

सरतपास नि. यू — २३९अे

<u>साक्षीदाराचे नाव : श्रीमती संगीता श्रीमान भूमकर शपथेवर उलटतपास</u>
<u>श्री जे बी शालीग्राम वकिल प्रथम पक्षकार तर्फे उलटतपास</u>

७. माझे शिक्षण तीसरी पर्यंत झालेले आहे. माझ्या सरतपासातील मजकूर मी वाचला होता. राष्ट्रीय श्रमिक आघाडी यांची मी सभासद आहे. मी तो पुरावा या कामी दाखल केला आहे. मी या संघटनेची सभासद झाल्याबद्द्ल माझ्याकडे पावती नाही. साक्षीदार पुन्हा सांगतात की मी सभासद असल्याची पावती न्यायालयात जमा केलेली आहे. मी यशवंत भोसले यांना ही केस चालवण्यासाठी अधिकार पत्र दिल्याबाबत लेखी पुरावा दाखल केला नाही.

८. मी प्रथम पक्षकार यांच्याकडे लेखी अर्ज केल्याबद्द्ल पुरावा दाखल केला नाही. महानगरपालिकेचे मुकादम हे माझ्या घरी नोकरी देउ करण्यासाठी आले होते. मला त्यांनी लेखी आदेश दिलेला नाही. हे खरे की महानगरपालिकेकडून मला माझ्या नेमणूकीबाबतचा लेखी आदेश मिळाला नव्हता. हे खरे की सन २००४ पासून आज अखेर मी महानगरपालिकेच्या सेवेत नाही. हे खरे नाही की महानगरपालिकेमध्ये मी कधीही नोकरी केलेली नाही. हे खरे नाही की मी कंत्राटदारतर्फे महानगरपालिकेमध्ये काम केले आहे.

९. आमच्या संघटनेने कंत्राटीपध्दत रद्य करावी म्हणून महाराष्ट्र शासनाकडे अर्ज केला होता हे मला माहित आहे. त्याचा निकाल आमच्यासारखा लागला. हे खरे नाही की महानगरपालिकेकडून पैसे उकलण्यासाठी मी

खोटी साक्षी देत आहे. हे खरे नाही की मी सुलभ एंटरप्राइजेस यांच्याकडे नोकरीस होते.

<u>उलटतपास पूर्ण</u>

फेरतपास काही नाही

सही

( पि. रा. भावके—पाटील )

पुणे
सदस्य,

दिनांक : ०८/८/२०१८
औद्योगिक न्यायालय, पुणे